## प्रेसनोट दि. ०५.०३.२०२२

लोकसेवक राजेंद्र आनंदराव देसाई वय ५० वर्ष कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमीटेड कोल्हापूर वर्ग-१ यांचे विरूध्द लाच स्विकारलेबाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार हे शासकीय कंत्राटदार असून त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कडून स्विकारलेल्या कामांचे बिल मंजूर करून देण्यासाठी स्थापत्य विभाग महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कोल्हापूर येथील देसाई, कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे ३०००००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२८.०२.२०२२ रोजी इकडील कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.०२.०३.२०२२ रोजी व आज दि.०५.०३.२०२२ ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे लोकसेवक देसाई, कार्यकारी अभियंता यांची पंचा समक्ष पडताळणी केली असता पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक देसाई, कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे ३,००,०००/- रूपये लाच मागणी करून चर्चे अंती १,५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज रोजी लोकसेवक देसाई, कार्यकारी अभियंता यांचे विरूध्द महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमीटेड विश्रामबाग येथील शासकीय विश्रामगृह या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक राजेंद्र आनंदराव देसाई वय ५० वर्ष कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कोल्हापूर वर्ग-१ यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १,५०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले आहे.

लोकसेवक राजेंद्र आनंदराव देसाई वय ५० वर्ष कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमीटेड कोल्हापूर वर्ग-१ रा.किंगकोर्ट अपार्टमेंट, फ्लॅट नं एफ -३, शिवाजी पार्क, कोल्हापूर यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री सुहास नाडगौडा, श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, संजय संकपाळ, सलिम मकानदार, प्रितम चौगुले, सिमा माने, संजय कलगुटगी, भास्कर भोरे, रविंद्र धुमाळ, राधिका माने चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली
सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner